**भारत आणि बांगलादेश द्वारे मच्छिमारांची सुटका**

09 डिसेंबर 2025

आंतरराष्ट्रीय सागरी सीमारेषा अनवधानाने पार केलेल्या भारतीय मच्छिमारांना बांगलादेशी अधिकाऱ्यांनी अलीकडेच अटक केली होती. अशाचप्रकारे बांगलादेशी मच्छिमारांनाही भारतीय अधिकाऱ्यांनी अटक केली होती.

2. उभय देशातर्फे आज (9 डिसेंबर 2025) रोजी 47 भारतीय मच्छिमार व 38 बांगलादेशी मच्छिमार यांची त्यांच्या बोटींसह यशस्वीरीत्या सुटका करून त्यांचे प्रत्यावर्तन करण्यात आले. जानेवारी 2025 मध्ये, भारत सरकारने 95 भारतीय मच्छिमारांच्या सुटकेची सोय केली होती. आणि त्याबदल्यात 90 बांगलादेशी मच्छिमारांना सोडण्यात आले होते.

3. उभय बाजूंनी मच्छिमार समुदायांच्या मानवतावादी व उपजीविकेच्या समस्या लक्षात घेऊन मच्छिमारांची आणि त्यांच्या बोटींची परस्पर देवाणघेवाण करण्यात आली.

4. भारत सरकारसाठी भारतीय मच्छिमारांची सुरक्षा, सुरक्षितता व कल्याण हे सर्वतोपरी महत्त्वाचे आहे. यासाठी, बांगलादेशच्या ताब्यातून आमच्या मच्छिमारांची सुरक्षितपणे सुटका करण्यासाठी ते सतत प्रयत्नशील राहिले.

नवी दिल्ली

09 डिसेंबर 2025